MHGA040006042025

दाखल तारीख : २२.०९.२०२५
नोंदणी तारीख : २२.०९.२०२५
निकाल तारीख : ०५.०५.२०२६
कालावधी : ००वर्ष, ०७म.,१३दि.

**नि.क्र.८ वर**

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय<br>(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)<br>(न्यायनिर्णयाची तारीख :०५/०५/२०२६)<br>सं.फौ.मा.क्र.३९६/२०२५** |
| | अपराध क्र. :२६९/२०२५<br>पोलीस स्टेशन : आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. उईके |
| **आरोपी** | **लिलाधर लहानु लाडे,**<br>वय ६० वर्षे, व्यवसाय शेती,<br>राह. वैरागड, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | आरोपींचे विधिज्ञ श्रीमती पठान |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | ०७.०७.२०२५ |
| प्रथम खबरेची तारीख | ०७.०७.२०२५ |
| आरोपपत्राची तारीख | २२.०९.२०२५ |
| अपराधाचा तपशिल तयार करण्याची तारीख | २०.११.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | ०८.०१.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु.सं.च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिलाधर लहानु लाडे | कलम ३५(३) भा.ना.सु.सं. अन्वये सुचनापत्रावर सोडले. | १२(अ) महा. जुगार प्रतिबंध अधि. | निर्दोष | नाही | काही नाही |

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :-**

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | उमाजी केशव मडावी | ८ वर | पंच |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**क. न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ. फिर्यादी :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**ब. बचाव :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. भौतीक वस्तु :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०५ मे, २०२६ रोजी घोषित)

मौजा वैरागड, ता. आरमोरी येथील कुंभार मोहल्ला जवळ सार्वजनिक ठिकाणी आरोपी हा लोकांकडुन पैश्याची देवाण घेवाण करुन कागदी चिट्ट्यावर आकडे लिहुन

जुगाराचा हारजितचा खेळ खेळीत असतांना मिळुन आल्याने आरोपीवर कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनिम अंतर्गत गुन्हा नोंद करुन खटला चालविला. त्यानंतर अभियोग पक्षाने एक पंच साक्षीदार तपासला. आरोपींविरुध्द काहीही न आल्याने त्याचे कलम ३५१ चे बयाण नोंदविण्यात आले नाही. खालील मुद्दे माझे समोर उपस्थीत झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले आहे कायं दि.०७.०७.२०२५ रोजी १८.४० ते १९.३० वाजताचे दरम्यान मौजा वैरागड, ता. आरमोरी येथील कुंभार मोहल्ला सार्वजनिक ठिकाणी आरोपी हा लोकांकडुन पैश्याची देवाण घेवाण करुन कागदी चिट्ट्यावर आकडे लिहुन जुगाराचा हारजितचा खेळ खेळीत असतांना मिळुन आले, त्याद्वारे आरोपीने कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनिम अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणे-मिमांसा
### मुद्दा क्र.१ व २ :-

२. आरोपी विरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनिमाचे कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच सा.क्र.१ उमाजी मडावी याला तपासले आहे. सदर साक्षीदाराने साक्ष पुराव्यात सांगितले की, दि.०७.०७.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला पंचनामा करण्याकामी कुठेही बोलाविले नव्हते. तसेच आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनाम्यावरील असलेल्या सह्या त्याने त्याच्या असल्याचे मान्य केल्या. परंतु त्यातील मजकुर नाकारला. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत केलेली नाही. त्यामुळे सहा. सरकारी वकीलांनी त्याचा उलटतपास घेतला असता त्यात नकाराशिवाय काहीही आले नाही. आरोपीच्या वकीलांनी उलटतपास नाकारला.

३. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता पंच साक्षीदार याने अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी दिलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने आपले म्हणणे सिद्ध करण्याकरीता इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाहीत व फिर्यादी,

तपासी अमंलदार यांना पुराव्याकामी न्यायालयात हजर करु शकले नाही. पंच साक्षीदार याने सहकार्य न केल्याने पंचनामे कायद्याप्रमाणे सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे आरोपीने गुन्हा केला असे अभियोग पक्ष संशयाच्या पलीकडे सिद्ध करु शकलेला नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देण्यात येतो. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी नामे **लिलाधर लहानु लाडे** याची महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमाचे कलम १२(अ) चे आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त केलेली रोख रक्कम रु.५००/- ही अपिल कालावधी संपल्यानंतर सरकार जमा करण्यात यावी.

३. जप्त मुद्देमाल स्केल पट्टी आणि बॉल पेन अपिल कालावधी संपल्यानंतर लिलावात विक्री करावे व आलेली रक्कम सरकार जमा करावी.

४. जप्त कार्बन चिट्या आणि कार्बन तुकडा मुल्यहिन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावे.

५. आरोपीचा जात मुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

६. आरोपीने रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र कलम ४८१(१) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अन्वये दाखल करावे. सदर बंधपत्र पुढील ०६ महिन्यांसाठी अस्तीत्वात राहिल.

(आदेश खुल्या न्यायालयात तोंडी सांगण्यात आला व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.05.05 16:56:05 +0530

दिनांकः०५.०५.२०२६

(श्रीमती व्ही.व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी.